# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

**पूर्व उच्च प्राथमिक (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) दि. २४ फेब्रु. २०१९**

**शाळा माहिती प्रपत्र व विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन आवेदनपत्रातील माहितीत दुरुस्ती करणेबाबत.**

## प्रसिद्धीपत्रक

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दिनांक २४ फेब्रुवारी, २०१९ रोजी घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी), शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) करीता विद्यार्थ्यांच्या **ऑनलाईन आवेदनपत्रातील माहितीत व शाळा माहिती प्रपत्रात** दुरुस्ती करण्यासाठी बुधवार, दि. ०६/०३/२०१९ रोजी www.mscepune.in व https://puppss.msscescholarshipexam.in या परिषदेच्या संकेतस्थळावर शाळांच्या लॉगीनमध्ये सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

विद्यार्थ्यांचे नाव, आडनाव, वडीलांचे नाव, आईचे नाव, लिंग, शहरी / ग्रामीण, अभ्यासक्रम इत्यादीमध्ये दुरूस्तीसाठी दि. १५/०३/२०१९ पर्यंत संबंधित शाळेच्या लॉगीनमध्ये ऑनलाईन अर्ज उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सदर अर्ज ऑनलाईन व्यतिरिक्त अन्य कोणत्याही पध्दतीने पाठविल्यास स्वीकारले जाणार नाहीत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

(तुकाराम सुपे)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
पुणे - ०१.

ठिकाण - पुणे
दिनांक - ०७/०३/२०१९

d:\mokashi\2019\scholarship exam 2019 prasidhhipatrak.docx